साय-फाय करंडकसाठी मागविल्या प्रवेशिका

पुणे : थिएटरच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत जागरूकता पसरवण्याच्या दृष्टीने आयोजित करण्यात येणाऱ्या दुसऱ्या साय-फाय करंडक या एकांकिका स्पर्धेसाठी राज्यभरातून प्रवेशिका मागविण्यात आल्या. थिएटर अकॅडमी, आपले अध्यक्ष आणि नाट्यकर्मी प्रसाद पुरंदरे यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून आलेल्या प्रादेशिक केंद्रांच्या टीम्सची निवड केली जाणार आहे. डिजिटल दुनियेत आजच्या जीवनाचे प्रतिबिंब दिसत असेल, अशा एकांकिकांची निवड करण्यात येणार आहे. कॉलेज, स्वतंत्र गट आणि थिएटर संस्थांकडून १५ नोव्हेंबरपर्यंत प्रवेशिका स्वीकारण्यात येणार आहेत. साय-फाय करंडकमध्ये नोंदणी करण्यासाठी थिएटर अकॅडमी डॉट पुणे ॲट द रेट जी मेल डॉट कॉम या मेलवर मेल करा.